<u>प्रतिनियुक्तीने नियुक्ती</u>

**श्री. विनय गोसावी, उप जिल्हाधिकारी (नियुक्तीच्या प्रतिक्षेत) यांची उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्र. टिआरएफ-०६२३/प्र.क्र.१५२ (भाग-१)/ई-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २९ ऑगस्ट, २०२३

**संदर्भ**:- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५
२) सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.४९/कार्या-१२, दि.१४.०७.२०२१

**शासन आदेश :-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (५) व महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढूण टाकणे) नियम, १९८१ च्या नियम-४० मधील परिशिष्ट-२ मधील विहित अटी व शर्तीना अधीन राहून श्री. विनय गोसावी, उप जिल्हाधिकारी यांची **उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई** या पदावर **३ वर्षांच्या कालावधीसाठी** सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

२. उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई या पदावरील प्रतिनियुक्तीच्या अनुषंगाने श्री. विनय गोसावी, उप जिल्हाधिकारी यांच्या सेवा अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

३. श्री. विनय गोसावी, उप जिल्हाधिकारी यांनी अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे तात्काळ हजर व्हावे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२३०८२९१८४२०५०३१९ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ZAMIR AHMED SHAIKH

Digitally signed by ZAMIR AHMED SHAIKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=bd9b39db1f8efa7024db820b12b577501aa63b328fc3fa ed8b55bdbb9c7a9f99, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7599780B79479031238FD885FEB6D3048C179E75 BB21592FD3D953602CD5D8FA, cn=ZAMIR AHMED SHAIKH
Date: 2023.08.29 19:07:21 +05'30'

**( ज. अ. शेख )**
**शासनाचे सह सचिव**

**प्रति,**

- अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- विभागीय आयुक्त, नाशिक.
- विभागीय आयुक्त, कोकण.

**प्रत,**

- मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- संबंधित जिल्हाधिकारी.
- प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
- संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
- संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
- संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
- संबंधित उप जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्त, नाशिक यांचेमार्फत).
- सह सचिव (ई-२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- निवडनस्ती (ई-२).